

सी बी टी प्रकाशन

# लाल लाल छोटी गाडी

मेरी जेन हेनरी





BVBK-0402788

मुलगा व मुलगी दोघं ही समान आहेत हे गोष्टी रुपाने मुलांना समजाविण्यासाठीं सी.बी.टी. व युनिसेफ तर्फे १९८५ साली "नॅशनल कॉम्पिटिशन फॉर रायटर्स् ऑफ चिल्ड्रन्स बुक्स" नांवाची स्पर्धा आयोजित केली होती. त्यातील निवडलेल्या मूळ इंग्लिश "द लिटिल रेड कार्ट" चे "लाल लाल छोटी गाडी" हे मराठी रुपांतर आहे.

लेखिका इतिहासाच्या प्राध्यापिका आहेत. व त्या मुलांसाठी नाटकं लिहितात.


बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. २०८८
विषय बा.वा.

BVBK-0402788

**LAL LAL CHOTI GADI**

चित्रकार रुमा शर्मा
अनुवाद सुनीता गाडगीळ

© चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट 1989
ISBN 81-7011-378-4




रुपा आणि रुपी ही दोन लहान माकडं आपल्या आई वडीलांबरोबर एका मोठ्या सुंदर हिरव्यागार झाडावर रहात होती. ती इतक्या काही गोष्टी करण्यात मग्न असत की त्यांना कंटाळवाण कधी वाटायचंच नाही.



शरद ऋतु आला आणि झाडाची एक-एक करुन सर्व पानं गळून गेली. ओक्या बोक्या उजाड फांद्यामुळे माकडांना त्या झाडावर कांही मजा वाटेना. त्यांचे नेहमीचे खेळ पण त्यांना खेळता येईनात. त्यामुळे ती उदासपणे कंटाळा येऊन बसून रहायची.

एक दिवस त्यांची आई बाहेर आली आणि त्यांना म्हणाली, ''अरे एवढया लाकडी फळ्या इथे असतांना तुम्ही त्या घेऊन खेळत का नाही? पण रुपा आणि रुपीला फळयांशी खेळण्यात गोडी वाटत नव्हती." पण एकदम रुपा म्हणाला, " रुपी मला




एक कल्पना सुचली आहे. आपण ह्या सर्व फळ्या एकत्र करुन त्याची एक गाडी तयार करु या.''

''कल्पना फारच छान आहे,'' त्याची बहीण रुपी त्याला म्हणाली.




२७८८
बा.वा.


जराही वेळ न दवडता ती कामाला लागली. छिन्नी हातोडा आणि खिळे घेऊन ती झाडावरुन खाली धावू लागली.



दिवसें दिवस त्यांच काम वाढू लागल.
आठवडयाभरात त्यांनी एक सुंदर गाडी तयार केली.



"अगदी पूर्ण तयार होईपर्यंत गाडी आईच्या दृष्टीस पडू देऊ नकोस हं," रुपीनं असं म्हणत म्हणत गाडी झुडपामध्ये लपवली.



"आता फक्त लाल रंग राहिला," रुपा म्हणाला. रुपी धांवत धांवत आईकडे गेली आणि तिच्याकडे लाल रंग आहे का विचारु लागली.




“लाल रंग तुम्हांला कशाला हवा?” आई चौकशी करु लागली.

“आई आधी दे ना मग आम्ही कशाला हवा रंग ते सांगू,” रुपी म्हणाली.




आईला कोडं पडलं होतं तरी तिन एक छोटासा रंगाचा डबा मुलांच्या स्वाधीन केला. झुडपाजवळ रुपा वाट बघत होता, तिथे धावत धावत रुपी गेली. दोघांनी मिळून ती गाडी सुंदर लाल लाल रंगवली.






दुसरे दिवशी त्यांची आई म्हणाली, "अरे बाळांनो आज खूप खरेदी करायची आहे पण मी अगदी दमले आहे रे. आज सकाळच्या जेवण ांसाठी व रात्रींच्या जेवणांसाठी घरांत काही भाजी नाहीं."

रुपा आणि रुपी डोळे मिचकावत एकमेकांकडे बघत होती.



उत्साहाच्या भरात एक दुसऱ्याला इशारा करुन आईला म्हणाली, ''आईग
खाली चल आम्ही तुला खरेदी करायला मदत करु.''




आईनं घराला कुलूप लावलं. आणि ती खाली आली. चमकदार लाल रंगात रंगवलेली आणि उन्हात चकाकणारी सुंदर गाडी तिनं पाहिली. तिचा आपल्या डोळयांवर विश्वासच बसेना. ''मुलांनो केंव्हां केलीत ही गाडी? ती आश्चर्यानं म्हणाली,'' खंरच खूप सुंदर आहे गाड़ी.''

२८८८

आईला गाडी आवडली हे पाहून मुलं खूप आनंदीत झाली खुषीनं टाळया वाजवत ती आईला म्हणाली, ''आई आई चल लौकर बस गाडीत.''




त्यांची आई गाडीत चढून बसली. रुपाने मागून गाडीला धक्का दिला. गाडी चालू झाली, आधी हळूहळू आणि नंतर वेगाने.



२७८८
०१·०१·
BVBK-0402788

लौकरच ते बाजारात येऊन पोहोचले. आईने आवश्यक असणारी सर्व खरेदी आटोपली. दोन्ही पिल्लांनी सगळं सामान गाडीत व्यवस्थित रचून ठेवलं. आणि अशाप्रकारे ते सगळे आनंदाने घरी आले.

खुषीत येऊन त्यांची आई म्हणाली, ''धन्यवाद मुलांनो! आता मी रोज माझी खरेदी करु शकेन.''



चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नेहरु हाउस, 4 बहादुरशाह ज़फर मार्ग, नवी दिल्ली द्वारा प्रकाशित व ट्रस्ट च्या
इद्रप्रस्थ प्रेस नवी दिल्ली मध्यें मुद्रित.



Rs. 8.00 M 8

ISBN 81-7011-378-4